शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं ७०/२०१९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. बबन शंकर सातपुते | | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. प्राचार्य, मिरज महाविद्यालय, मिरज, जि.सांगली. | | वि. प |
| २. अध्यक्ष, यशवंत शिक्षण संस्था, सांगली, जि.सांगली. | | |

**तक्रारीचे स्वरूप :**

यशवंत शिक्षण संस्था, सांगली, या संस्थेचे मिरज महाविद्यालय, मिरज, जि. सांगली यांचेकडील सहा. प्राध्यापक श्री. बबन शंकर सातपुते विषय हिंदी यांनी दिनांक १०/०६/२०१९ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमुद तक्रार पुढील प्रमाणे.

मी यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड) व्दारा संचलित मिरज महाविद्यालय, मिरज येथे दि. १ ऑगस्ट, १९९६ पासून हिंदी विषयाचा सहा. प्राध्यापक म्हणुन काम करीत आहे. मी एम. फिल. ही पदवी दि. २२ डिसेंबर १९९८ रोजी धारण केली आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने मला नियमित शिक्षक स्वरूपाची मान्यता दिलेली आहे व मी सेवेत कायम आहे. त्यामुळे CAS अंतर्गत असणाऱ्या पदोन्नत्या मिळण्यास मी पात्र आहे.

माझी पहिली पदोन्नती (वरीष्ठ श्रेणी अधिव्याख्याता) २००३ मध्ये होणे आवश्यक होते व आहे. मी यासाठी महाविद्यालयाच्या प्रशासनाकडे अर्ज व विनंत्या केल्या परंतु महाविद्यालय प्रशासनाने त्याबाबत कोणतीही हालचाल केली नाही. त्यानंतर माझी दुसरी पदोन्नती (निवड श्रेणी अधिव्याख्याता) ही २००३ पासून पाच वर्षांने म्हणजेच २००८ मध्ये होणे आवश्यक होते व आहे. याबाबत ही महाविद्यालय प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तसेच CAS अंतर्गतची माझी तिसरी पदोन्नती (सहयोगी प्राध्यापक) २००८ नंतर तीन वर्षांनी म्हणजेच २०११ मध्ये होणे आवश्यक होते व आहे. याबाबत ही महाविद्यालय प्रशासनाने माझे बाबतीत कोणतीही प्रक्रिया केलेली नाही.

CAS अंतर्गत पदोन्नत्या मिळाव्यात म्हणून मी महाविद्यालय प्रशासनास वारंवार अर्ज व विनंत्या केल्या आहेत. समक्ष भेटून सुध्दा तोंडी विनंत्या केल्या

आहेत. परंतु महाविद्यालय प्रशासनाने मला या पदोन्नत्यांचे लाभ मिळण्यासाठी मी केलेल्या लेखी / तोंडी विनंत्यांचा काहीही विचार केलेला नाही. दरम्यान विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयकडून CAS अंतर्गत पदोन्नत्यांसाठी पात्र असणाऱ्या अधिव्याख्यात्यांचे / सहाय्यक प्राध्यापकांचे प्रस्ताव मागविले. त्यावेळेसही मी माझा प्रस्ताव पाठवून देणेबाबत लेखी / तोंडी विनंती महाविद्यालय प्रशासनाकडे केली. परंतू महाविद्यालय प्रशासनाने माझ्या विनंतीचा विचार केला नाही व माझे CAS अंतर्गत पदोन्नत्यांचे प्रस्ताव पाठविले नाहीत. त्यामुळे मी व्यथित झाल्याने स्वत:हून प्रस्ताव केले, विद्यापीठाने निर्धारीत केलेली फी भरली व विद्यापीठाकडे स्वत:हून प्रस्ताव सादर केले. परंतू मी दिलेले प्रस्ताव महाविद्यालय / संस्था मार्फत (Through proper chanel) गेले नसल्याने त्रुटींची पूर्तता करून "पुर्ण प्रस्ताव प्राचार्यांच्या मार्फत सादर करणे आवश्यक" असे विद्यापीठाने नमुद केले आहे. तसेच विद्यापीठाने "त्रुटी पूर्ततेबाबतची जबाबदारी महाविद्यालयाची / संस्थेची राहील याची नोंद घ्यावी" असे निर्देश मा. प्राचार्य यांना दिले. परंतु तरीही मा. प्राचार्य यांनी माझे प्रस्ताव त्यांचे मार्फत पाठविले नाहीत.

मी अनुसुचित जाती संवर्गातील असून शासन नियमाने देय असणाऱ्या पदोन्नत्या / लाभ मिळण्यास मी पात्र होतो व आहे. परंतू केवळ मला त्रास देण्याच्या हेतुने महाविद्यालय प्रशासन गेल्या दहा बारा वर्षामध्ये मला वेळोवेळी देय असणाऱ्या पदोन्नत्यांचे प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठवून देत नाहीत. त्यामुळे मी पात्र असून ही मला देय असणाऱ्या पदोन्नत्यांचे लाभ मिळाले नाहीत. परिणामी माझे वेतन वाढले नाही. त्यामुळे माझे व माझ्या कुटुंबाचे आर्थिक, मानसिक, शारीरिक खच्चीकरण झाले आहे व होत आहे.

सबब शासन नियमाने मला देय असणाऱ्या CAS अंतर्गत पदोन्नत्या / लाभ पूर्वलक्षी प्रभावाने त्वरीत देण्याबाबत महाविद्यालय प्रशासनास लवकरात लवकर आदेश व्हावेत ही नम्र विनंती.

**संस्थेचा अभिप्राय :**

डॉ. बी.एस. सातपुते हे सन १९९६ पासून महाविद्यालयाच्या सेवेत कार्यरत आहेत. डॉ. सातपूते यांचे वर्तन शिक्षकी पेशाला न शोभणारे व गुन्हेगारी स्वरूपाचे आहे. अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या शिक्षक पदावर काम करण्यास लायक नसलेल्या व्यक्तीच्या गैरकृत्याची चौकशी शिवाजी विद्यापीठाचे पत्र जा.क्र ॲफी/टे. ५/व्ही/३०४४ दि.२३ जून २००५ आणि जा.क्र ॲफी/टे.५/व्ही/८६६२ दि. २९/१०/२००५ अन्वये चौकशी समिती नियुक्त केली होती. त्या चौकशी समितीने डॉ. सातपुते यांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीची चौकशी करून आपला अहवाल संस्थेस सादर केला होता व त्या अहवालात डॉ. सातपुते यांनी प्राचार्यांची बनावट सही केल्याचे मान्य केल्याचे नमूद केलेले होते. प्राथमिक चौकशी समितीच्या अहवालाच्या आधारे संस्थेने विद्यापीठाची परवानगी घेवून चौकशी अधिकाऱ्यामार्फेत डॉ. सातपुते यांच्यावरील आरोपांची चौकशी केली. चौकशी अधिकाऱ्यांनी डॉ.

सातपुते यांच्यावरील सर्व आरोप सिध्द झाल्याचा अहवाल संस्थेस कळविल्यावर संस्थेने त्या बाबत डॉ. सातपुते यांना प्राचार्यांची बनावट सही करून गंभीर स्वरूपाचे गैरकृत्य केल्याने आपणांस कामावरून का कमी करू नये अशी नोटीस बजावली असता आपल्यावर दया दाखवावी अशी विनंती केल्यामुळे त्यांच्या तीन वेतनवाढी रोखून त्यांना सेवेत कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

संस्थेने त्यांचा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा माफ करून सुधारण्याची संधी दिली होती तरीही डॉ.सातपुते यांच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झाली नाही. अध्यापनाच्या कामामध्ये हलगर्जीपणा करणे, महाविद्यालय प्रशासनाला सहकार्य न करणे हे त्यांनी चालूच ठेवले होते.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थामध्ये काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन उपस्थिती संबधी बायोमेट्रीक प्रणालीचा अवलंब करणेबाबतचे आदेश दिनांक ०५ जानेवारी २०११ साली निर्गमित केले. त्यानूसार आमच्या महाविद्यालयात बायोमेट्रीक प्रणाली बसवून जून २०११ पासून महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची महाविद्यालयात प्रवेश करताना व दिवसाचे कामकाज संपवून परत जाताना बायोमेट्रीक प्रणालीद्वारे वेळेची नोद करावी असा आदेश काढला होता. डॉ.सातपुते व इतर काहीं शिक्षकांनी या आदेशाचे पालन केले नाही. त्यामुळे त्यांच्यावर शासनाने निर्धारीत केलेली दंडात्मक कारवाई केल्यावर डॉ.सातपुते व इतर शिक्षकांनी शहरात मध्यवर्ती चौकात निर्देशने करून संस्थेची व महाविद्यालयाची बदनामी केली असता महाविद्यालयाने त्यांच्या बेकायदेशिर कृत्याची चौकशी करण्यासाठी प्राथमिक चौकशी समिती नेमण्यास विनंती केली असता विद्यापीठाने संदर्भ क्र. एसयु/संलग्नता/टे.५/एमव्हीके/६४४७ दि. ०९सप्टेंबर २०१५ नुसार चौकशी समिती नियुक्त केली. तथापी चौकशी समिती सदस्य श्री. देसाई यांनी चौकशीकामी सहकार्य न केल्यामुळे चौकशी अपूर्ण राहीली.

महाविद्यालयाने फेर चौकशीसाठी प्राथमिक चौकशी समितीची मागणी केल्यानंतर विद्यापीठाने चौकशी समिती नियुक्त केली परंतु ही समिती शिवाजी विद्यापीठाच्या तरतुदीच्या विरूध्द होती. त्यामुळे महाविद्यालयाने ही चौकशी समिती मान्य केली नाही. सध्या चौकशी समितीचा वाद न्यायप्रविष्ठ आहे.

दरम्यान डॉ.सातपुते यांनी आपले गैरवर्तन चालूच ठेवले होते. २०१७ साली डॉ. सातपुते यांनी पुन्हा एक गंभीर स्वरूपाचे गुन्हेगारी कृत्य केले आहे.

महाविद्यालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अर्थसहाय्याने दि.१४ डिसेंबर २०१३ रोजी हिंदी विषयासंबधित राज्यस्तरीय चर्चा सत्र आयोजित केले होते. त्या चर्चासत्राचा वृत्तांत हिंदी विभागप्रमुख डॉ.शाहीन जमादार यांनी मे २०१४ मध्ये प्रकाशीत केला होता. व त्याच्या प्रती विद्यापीठ अनुदान आयोग व शिवाजी विद्यापीठला पाठविलेल्या होत्या.

डॉ.बी.एस.सातपुते यांनी हेच पुस्तक जसेच्या तसे प्राचार्य अथवा विभागप्रमुख डॉ.सौ.जमादार यांची परवानगी न घेता स्वतःचे नाव सहसंपादक असे नमूद करून छापून घेवून फौजदारी गुन्हा केलेला आहे. डॉ. सातपुते यांच्या या गुन्हेगारी कृत्याच्या चौकशीसाठी रितसर पोलीस खात्यात तक्रार केलेली आहे.

अशा स्वरूपाच्या तक्रारी असल्यामुळे यशवंत शिक्षण संस्थेत डॉ.बी.एस. सातपुते यांची स्थाननिश्चिती न करण्याचा निर्णय घेतला आहे.

**समितीची निरिक्षणे :**

या प्रकरणी कॅस (CAS) अंतर्गत तक्रारदाराची पदोन्नती होणे ही आवश्यक प्रक्रिया आहे व त्याबाबत विद्यापीठाच्या कॅस (स्थाननिश्चिती) समितीकडे प्रस्ताव पाठाविणे आवश्यक आहे. तथापी या तक्रारीकामी समितीस असे निर्देशनास आले की, संस्था व महाविद्यालय प्रशासनाने वेळोवेळी विद्यापीठाच्या कॅस अंतर्गत समितीकडे तक्रारदार यांचा स्थाननिश्चितीचा प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही केलेली नाही. तसेच सन २००३ पासून तक्रारदार यांची कॅस बाबत निकष व अटींच्या अनुषंगाने प्रस्ताव पाठविणे आवश्यक होते. तक्रारदार यांचे महाविद्यालय अगर संस्थेने कॅस अंतर्गत पदोन्नत्यांचे प्रस्ताव पाठविलेले नाहीत. अथवा तक्रारदाराने विद्यापीठाकडे पाठविलेले सर्व प्रस्ताव महाविद्यालय/संस्था यांनी अग्रेषित केले नसल्याने कॅस समितीने त्रुटी पुर्तता करणेस प्रस्ताव परत पाठविले आहेत. तक्रारदाराने या बाबत विद्यापीठाचे जा.क्र. संलग्नता /टे.१/युजीके/१३४ दि.२६/११/२०१४ चे पत्र संस्थेस दिलेले आहे.

विद्यापीठाने तक्रारदारासंबधी आणखी एक पत्र जा.क्र. एसयु/संलग्नता/स्था/टे १/वंगार/५४१२ दि. ३०/०५/२०१९ रोजी पाठविले आहे व त्याला महाविद्यालयाने जा.क्र.२१७४/२०१८–१९ दिनांक २७ फेब्रूवारी २०१९ ने उत्तर दिले आहे. सदर पत्रामध्ये प्राचार्यांनी अशी बाजू मांडली आहे की, श्री सातपुते यांनी सन २००४ साली दहा लाख रूपये कर्ज काढणेकरीता कागदपत्रावर तत्कालीन प्राचार्यांची बनावट सही असलेली कागदपत्रे राजारामबापू सह. बॅक लि. पेठ शाखा सांगली या बॅकेंस सादर केली होती. तसेच जानेवारी २०११ मध्ये बायोमेट्रीक प्रणाली बाबत निर्देशने व आंदोलने केली होती. त्यावेळी त्यांनी संस्थेचे अध्यक्ष श्री.शरद पाटील यांचेविरूध्द बदनामीकारक पत्र छापलेने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच अर्जदाराने स्वतःच्या नावे डॉ.शाहीन एजाज जमादार यांचे पुस्तक प्रकाशीत केल्याने पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल झाली आहे. या करीता श्री. सातपुते यांच्या स्थाननिश्चितीस संस्था व महाविद्यालय यांचा विरोध आहे.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकूण घेतल्यावर समितीच्या असे निर्देशनास येते की, संस्थेने विद्यापीठांच्या नियमांचे पायमल्ली करण्याचे अवलंबले आहे. संस्थेच्या म्हणणेनूसार शिस्तभंग केल्याप्रकरणी तक्रारदारास त्याच्या दोन वेतनवाढी रोखून

धरले होते. तरी शिक्षेचा अंमल संपल्यानंतर संस्थेने तक्रारदाराच्या स्थाननिश्चितीबाबत कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतू केवळ गुन्हा दाखल आहे या कारणास्तव प्रस्ताव न पाठविणे योग्य ठरत नाही. एखाद्या व्यक्तीविरूध्द दोषारोप कायद्यात नमूद कार्यप्रणाली प्रमाणे सिध्द होत नाही तोपर्यंत तो निर्दोष आहे असे समजले जाते. नियमित सेवेतील शिक्षक स्थाननिश्चितीसाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले निकष व अटींची पूर्तता करत असतील तर त्यांची स्थाननिश्चिती होणे आवश्यक आहे. संपूर्ण कागदपत्रे पाहता व दोन्ही बाजूंचे म्हणणे विचारपुर्वक ऐकल्यावर या समितीचे असे मत झाले आहे की, संस्थेची कार्यवाही अयोग्य व बेकायदेशीर आहे. करीता ही समिती खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सस्था व महाविद्यालय यांनी तक्रारदार यांचा स्थाननिश्चिती बाबतचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी एक महिन्याच्या आत विद्यापीठ कार्यालयाकडे योग्य त्या कागदपत्रांसह सादर करावा.

**दिनांक :** 28 FEB 2020

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

**अध्यक्ष**
**(श्री. एस.पी.कुलकर्णी)**

**सदस्य**
**(श्री. व्ही. डी. नांदवडेकर)**

**सदस्य**
**(श्री. पी.डी. राऊत)**

**सदस्य**
**(श्री.आर.बी.तुपे)**

**सदस्य**
**(श्री.एन.बी.गायकवाड)**

**सदस्य सचिव**
**(श्रीमती ए.ए. कदम)**